# महात्मा फुले कृषि विद्यापीठ,राहुरी

कार्यालय : उद्यानविद्या विभाग (प्रक्षेत्र कार्यालय)

फोन नंबर :- ०२४२६-२४३४४२

# जाहीर लिलाव

उद्यानविद्या विभाग (प्रक्षेत्र),मफुकृवि,राहुरी या कार्यालयाच्या अधिनस्त जुने निरुपयोगी शेती औजारे व जडवस्तू संग्रहाचा जाहीर तोंडी लिलावाव्दारे विक्री करावयाची आहे.

लिलावाची तारीख :- **दि.१८/०९/२०२४** वेळ :- सकाळी **११.००** वाजता

ठिकाण :- **उद्यानविद्या विभाग (प्रक्षेत्र),मफुकृवि,राहुरी**

लिलावाबाबतच्या नियम व अटी तसेच लिलावाच्या वस्तु लिलावाच्या ठिकाणी दि.१२/०९/२०२४ पासून कार्यालयीन वेळेत पाहण्यास मिळतील. लिलावात भाग घेण्यासाठी प्रत्येक बोलीदारास लिलाव सुरु होणे अगोदर **रु.२०,०००/-** (वीस हजार रु.मात्र) अनामत रक्कम जमा करावी लागेल. सदर लिलावाच्या नियम व अटी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (www.mpkv.ac.in) व उद्यानविद्या विभाग (प्रक्षेत्र),मफुकृवि,राहुरी येथील नोटीस बोर्डावर पाहण्यास मिळतील. तसेच लिलावाबाबत मा.अध्यक्ष,लिलाव समितीचा निर्णय अंतिम राहील

**अध्यक्ष**
**निकामी व निरुपयोगी साहित्य विल्हेवाट समिती,तथा**
**प्रमुख, उद्यानविद्या विभाग**
**मफुकृवि,राहुरी**

**उद्यानविद्या विभाग (प्रक्षेत्र),मफुकृवि,राहुरी यांचेकडील जुने निरुपयोगी शेती औजारे व जड वस्तू साहित्याचा जाहीर तोंडी लिलाव बाबतच्या अटी व नियम**

१. जुने निरुपयोगी शेती औजारे व जड वस्तू सग्रंहाची विक्री जाहीर तोंडी लिलावाव्दारे केली जाईल.

२. जाहीर तोंडी लिलावामध्ये भाग घेणा-यास लिलावाच्या अगोदर अनामत रक्कम म्हणून **रु. २०,०००/-** रोख स्वरुपात सकाळी ११.०० वाजेपर्यत जमा करणे आवश्यक राहील. रोख रक्कमेसोबत संपुर्ण नांव,पत्ता,मोबाईल नंबर व आधार कार्ड झेरॉक्स इत्यादी लिहीलेले पाकीट देणे आवश्यक आहे. त्याशिवाय तोंडी लिलावामध्ये भाग घेता येणार नाही.

३. या कार्यालयाकडील निरुपयोगी साहित्याचा लिलाव वस्तूंचे गट (लॉट) करुन करण्यात येईल.

४. लिलाव झालेनंतर ज्या लिलाव धारकाने सर्वोत्तम बोलीला लिलाव घेतला असेल,त्यांनी विकत घेतेलेल्या मालाची संपूर्ण किंमत लिलावाच्याच दिवशी भरणे बंधनकारक राहील. (NEFT/RTGS व अपवादात्मक परिस्थितीत रोखीणे स्वीकारले जातील).

५. लिलाव घेतलेल्या गटातील माल ताबडतोब उचलण्याची व्यवस्था करावी लागेल. संपूर्ण माल ताबडतोब उचलणे शक्य नसल्यास दोन दिवसांच्या आत संपूर्ण माल उचलावा लागेल. दोन दिवसात सदर माल उचलला नाही तर त्या मालावरील आपला हक्क रदद समजण्यात येवुन आपण भरलेली अनामत व लिलावाची रक्कम जप्त करण्यात येईल व सदर लॉटचा लिलाव रदद करण्यात येईल. या बाबत मा.अध्यक्षांचा निर्णय अंतिम राहील.

६. लिलावात भाग घेणा-याने लिलावातील वस्तू खरेदी केलेनंतर सदरच्या वस्तू उचलण्याची व सांभाळण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधीत लिलाव धारकावर राहील. त्याबाबत कुठलीही तक्रार स्विकारली जाणार नाही.

७. लिलावात येणारी किंमत किंवा किंमती बाबतची तडजोड किंवा कोणत्याही वादा बाबतचा अंतिम निर्णय देण्याची अथवा सदर मालाच्या गटाचा लिलाव पूर्ण रदद करण्याचा हक्क मा.अध्यक्षांनी राखुन ठेवला आहे.

८. लिलावात बेकायदेशीर कृत्य आढळून आल्यास अशा व्यक्तींची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व त्यापुढील लिलावात त्यांना भाग घेता येणार नाही.

९. सदरच्या लिलावामध्ये होणारा व्यवहार हा मा.न्यायालय,राहुरी यांचे कक्षेत राहील.

१०. जाहीर तोंडी लिलावाची बोली **रु.१०००/-** च्या पटीत बोलावी लागेल.

११. ज्या व्यक्तींनी अनामत रक्कम जमा केली असेल त्याच व्यक्तींना गेटच्या आत प्रवेश दिला जाईल. इतर कुणालीही गेटच्या आत प्रवेश दिला जाणार नाही.

**अध्यक्ष**
**निकामी व निरुपयोगी साहित्य विल्हेवाट समिती,तथा**
**प्रमुख, उद्यानविद्या विभाग**
**मफुकृवि,राहुरी**